**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह ४ मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती
- बिहारमध्ये मतदार याद्या सखोल पुनरिक्षण मोहिमेअंतर्गंत आढळली अनेक परदेशी नागरिकांची नोंद
- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होणार
- विम्बल्डन टेनिस स्पर्धेचा अंतिम सामना आज अग्रमानांकित जेनिक सिन्नर आणि दोन वेळचा गतविजेता कार्लोस अल्काराझ यांच्यात रंगणार

**आणि**

- तेलगु चित्रपटसृष्टीतले प्रसिद्ध अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचं निधन

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची राज्यसभेसाठी सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. निकम यांच्यासह समाजसेवक सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचीही नियुक्ती झाल्याची अधिसूचना गृह मंत्रालयानं आज जारी केली. संविधानाच्या अनुच्छेद ८० अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करत राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे.

उज्ज्वल निकम यांनी मुंबईवर दहशतवादी हल्ला प्रकरणात सरकारी वकील म्हणून काम केलं होतं. सदानंद मास्टर हे केरळचे असून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाचं योगदान दिलं आहे. हर्षवर्धन श्रृंगला यांनी अमेरिका, बांग्लादेश आणि थायलंड इथं भारताचे राजदूत म्हणून काम केलं आहे. तसंच ते २०२३ मध्ये भारताच्या अध्यक्षतेसाठी झालेल्या G 20 शिखर परिषदेचे मुख्य समन्वयक म्हणून कार्यरत होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेसाठी नामनिर्देशित झालेल्या या चारही व्यक्तींचं समाजमाध्यमावरून अभिनंदन केलं आहे. उज्ज्वल निकम यांची कायद्याच्या क्षेत्रातील आणि संविधानाप्रती असलेली निष्ठा अनुकरणीय आहे. ते केवळ यशस्वी वकील नाहीत, तर अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी अग्रस्थानी राहिले आहेत. इतकंच

नाही तर, निकम यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत संविधानिक मूल्यांना बळकटी देण्यासाठी सातत्यानं काम केलं आणि सर्वसामान्य नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळावी, यासाठी प्रयत्नशील राहिले आहेत, अशा शब्दांत प्रधानमंत्र्यांनी निकम यांचं अभिनंदन केलं.

**<><><>**

बिहारमध्ये मतदार याद्या सखोल पुनरिक्षण मोहिमेअंतर्गंत अनेक परदेशी नागरिकांची नोंद आढळली आहे. या मोहिमेअंतर्गत  निवडणूक अधिकारी घरोघरी जाऊन मतदार याद्यांची तपासणी करत आहेत. या तपासणीत मोठ्या संख्येनं नेपाळ, बांग्लादेश, म्यानमार देशांतील नागरिकांच्या नोंदी आढळल्या आहेत.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या परदेशी नागरिकांकडे आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, रेशन कार्ड आणि इतर कागदपत्रं आढळली आहेत. याची निवडणूक आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. १  ते ३० ऑगस्ट या कालावधीत या प्रकरणांची सखोल चौकशी केली जाईल,  असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांच्यासह आणखी ३ अंतराळवीरांना घेऊन ॲक्सियॉम - फोर हे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता रवाना होईल. हे यान येत्या मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास पृथ्वीवर उतरेल. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली.

**<><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर सध्या सिंगापूरच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी सिंगापूरचे परराष्ट्रमंत्री विवियन बालकृष्णन यांची भेट घेतली. जगाचं राजकीयदृष्ट्या बहुध्रुवीकरण अटळ असून  त्यात भारताची महत्त्वाची भूमिका असेल, असं एका समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये बालकृष्णन यांनी म्हटलं आहे.

डॉ. जयशंकर यांनी टेमास्क होल्डिंग्जचे अध्यक्ष टिओ ची हीन यांचीही भेट घेतली. भारताच्या बदलत्या भूमिकेबाबत आणि गुंतवणूक संधींबाबत परराष्ट्रमंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा केली.

सिंगापूर भेटीनंतर जयशंकर हे विविध देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्याकरता चीनमधल्या टान्जीन इथं जाणार आहेत.

<><><><>

रशियानं युक्रेनवर केलेल्या कारवाईला उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जाँग-उन यांनी बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. सर्व महत्त्वाच्या धोरणात्मक बाबींवर रशिया आणि उत्तर कोरिया या दोन्ही देशांचा दृष्टीकोन सारखाच असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. उत्तर कोरियाच्या दौऱ्यावर असलेले रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गी लाव्हरॉव्ह यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर किम बोलत होते. गेल्यावर्षी दोन्ही देशांनी केलेल्या द्विपक्षीय सहकार्य करारानंतर झालेल्या दुसऱ्या धोरणात्मक संवादासाठी लाव्हरॉव्ह उत्तर कोरियाला गेले आहेत. दोन्ही देशांनी केलेल्या या कराराचं लाव्हरॉव्ह यांनी 'अजिंक्य लढवैय्यी बंधुता' अशा शब्दांमध्ये वर्णन करतानाच उत्तर कोरियाचे सर्वेसर्वा किम जाँग यांचं रशियाला लष्करी समर्थन दिल्याबद्दल आभार मानले आहेत.

<><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेचा अंतिम सामना आज अग्रमानांकित जेनिक सिन्नर आणि दोन वेळचा गतविजेता कार्लोस अल्काराझ यांच्यात रंगणार आहे. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतही अजिंक्यपदासाठी अंतिम लढत या दोघात झाली होती. तेव्हा अल्काराझ हिरवळीवरच्या खेळातही वर्चस्व सिद्ध करणार ? की सिन्नर फ्रेंच स्पर्धेतल्या पराभवाचा वचपा काढणार ? याबद्दल टेनिसप्रेमींमधे उत्सुकता आहे.

महिला एकेरीच्या काल झालेल्या एकतर्फी अंतिम सामन्यात पोलंडच्या इगा स्वियातेकनं अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाला केवळ ५७ मिनिटांत ६-०, ६-० असं हरवून आपलं सहावं ग्रँड स्लॅम विजेतेपद आणि विम्बल्डनमधलं पहिलं विजेतेपद मिळवलं. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिली पोलिश महिला ठरली आहे.

दरम्यान, ज्युलियन कॅश आणि लॉयड ग्लासपूल यांनी विम्बल्डन २०२५ मध्ये इतिहास रचला. १९३६ नंतर पुरुष दुहेरीचं विजेतेपद जिंकणारी ही पहिली, पूर्ण ब्रिटिश जोडी ठरली आहे. या जोडीनं ऑस्ट्रेलियाच्या रिंकी हिजिकाटा आणि नेदरलँड्सच्या डेव्हिड पेलला २-० असं पराभूत केलं. ८९ वर्षांपूर्वी पॅट ह्यूजेस आणि रेमंड टकी या ब्रिटिश जोडीनं पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं होतं.

<><><>

भारताच्या महिला क्रिकेट संघानं इंग्लंडविरुद्धची टी-ट्वेंटी मालिका तीन विरूद्ध दोन अशा फरकानं जिंकून ऐतिहासिक विजय नोंदवला आहे.

महिला क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच टी-ट्वेंटी मालिका विजय आहे. मालिकावीर म्हणून भारताची गोलंदाज नल्लापुरेड्डी श्री चराणी हिला गौरवण्यात आलं. काल, बर्मिंगहॅम इथं झालेला मालिकेतला पाचवा अंतिम सामना इंग्लंडच्या महिला संघानं पाच गडी राखून जिंकला. तथापि, याआधीच भारतानं तीन-एक अशी विजयी आघाडी घेतलेली होती.

कर्णधार हरमनप्रीत कौर सर्वाधिक सामने खेळणारी भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. हा तिचा ३३४ वा आंतरराष्ट्रीय सामना होता.

<><><>

अँडरसन-तेंडुलकर क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी यजमान इंग्लंड संघ आज भारताविरुद्धचा आपला  दुसरा डाव, बिनबाद २ धावांवर खेळणार आहे. सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल.

<><><>

गेल्या दहा दिवसांत १ लाख ८२ हजारांहून अधिक भाविकांनी अमरनाथ यात्रा केली असून आज सात हजार भाविकांचा आणखी एक जत्था जम्मूपासून काश्मीरकडे रवाना झाला.

यात्रा सुरळीत आणि शांततेत पार पडत असल्यामुळे आज ही संख्या दोन लाखांच्या पुढे जाईल अशी प्रशासनाला अपेक्षा आहे.

गुरुवारी पहलगाममध्ये छडी मुबारक म्हणजेच भगवान शंकराच्या पवित्र गदेचे भूमिपूजन करण्यात आलं.  छडी मुबारक येत्या ९ ऑगस्ट रोजी पवित्र गुहेत पोहोचल्यावर यात्रेचं औपचारिक समापन होईल.

२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणा अधिक बळकट करण्यात आली आहे. भारतीय लष्कर, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, सशस्त्र सीमा दल आणि स्थानिक पोलिसांबरोबरच केंद्रीय सशस्त्र दलाच्या १८० अतिरिक्त कंपन्याही सुरक्षेसाठी तैनात करण्यात आल्या आहेत. लष्करी

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार इलेक्ट्रॉनिक युद्ध किंवा ड्रोनवर आधारित हल्ल्याचे संभाव्य धोके टाळण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे.

**<><><><>**

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतले प्रसिद्ध अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचं आज पहाटे चार वाजता हैदराबाद इथल्या त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते.

कोटा श्रीनिवास राव यांचा जन्म १० जुलै १९४२ रोजी आंध्र प्रदेशात कांकीपाडु इथं झाला. महाविद्यालयीन जीवनातच त्यांचं अभिनयाशी नातं जुळलं. ७०० हून अधिक चित्रपटांत भूमिका साकारत आपलं स्वतःचं असं वेगळं स्थान त्यांनी निर्माण केलं. १९९९ मध्ये भाजपाच्या तिकिटावर विजयवाडा पूर्व मतदारसंघातून कोटा श्रीनिवास राव आमदार म्हणून निवडून आले होते.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी कोटा श्रीनिवास राव यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><>//**